# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:14.07.2025** **वार:सोमवार**

1. ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांच्यासह अन्य तीन मान्यवरांची राष्ट्रपतींकडून राज्यसभेवर नियुक्ती
2. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या बळकटीकरणासाठी लोकाभिमुख ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
3. भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्यासह ॲक्सिओम-4 मोहिमेतील तीन अंतराळवीरांचा परतीचा प्रवास आजपासून सुरू आणि
4. अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना जिंकण्याची भारताला संधी

**<u>राज्यसभा खासदार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम, सामाजिक कार्यकर्ते सी. सदानंदन मास्टर, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला तसंच इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. मीनाक्षी जैन यांची राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. या चारही मान्यवरांच्या नियुक्तीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्वांचं अभिनंदन केलं आहे. राज्यसभेवर नियुक्ती झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम म्हणाले....

**राष्ट्रपतींच्या तर्फे नियुक्त सभासद असल्याने माझ्यावरती मोठी जबाबदारी असणार आहे त्यामुळे कायद्याचा अभ्यास कायद्याचं विश्लेषण या देशाच्या ऐक्याकरता देशातील लोकशाही आमचं संविधान हे कशा रीतीने प्रबळ राहील याची काळजी घेण्याकरता मी माझ्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे मी निश्चित प्रयत्न करेल.**

निकम यांची राज्यसभेवर नियुक्ती झाल्याचं कळाल्यावर जळगाव इथल्या बॅरिस्टर निकम चौकाजवळच्या ॲडवोकेट निकम यांच्या निवासस्थानी काल आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

**<u>बनावट खते कारवाई</u>**

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांविरुद्ध तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश केंद्रानं दिले आहेत. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी याबाबत देशातील सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे. बनावट खतांची विक्री, खतांचा काळाबाजार यासारख्या बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार खतांचा पुरवठा करणं आवश्यक आहे, असं शिवराजसिंह चौहान म्हणाले. राज्य पातळीवर या कामाचं नियमित निरीक्षण केल्यास शेतकऱ्यांच्या हितासाठी एक प्रभावी आणि शाश्वत उपाय मिळेल, असंही कृषी मंत्री म्हणाले.

**<u>रेल्वे सीसीटीव्ही</u>**

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वेच्या सर्व डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयानं घेतला आहे. रेल्वेच्या सर्व 74 हजार कोचेस आणि 15 हजार इंजिनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मान्यता दिली आहे. प्रत्येक रेल्वे कोचमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे असतील आणि प्रत्येक इंजिनामध्ये सहा सीसीटीव्ही कॅमेरे असतील. 100 किलोमीटर प्रति तास वेगानं धावणाऱ्या आणि कमी प्रकाशात धावणाऱ्या रेल्वे गाड्यांसाठी देखील उच्च दर्जाचे फुटेज उपलब्ध असावं, याची खात्री करण्याचं आवाहनही त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केलं आहे.

**न्यायसहायक प्रयोगशाळा**

देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात आली आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. सायबर फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक सक्षम करण्यात येईल, असंही ते म्हणाले. नागपूरमधल्या धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचं ऑनलाईन लोकार्पण काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**देशातली सगळ्यात आधुनिक अशा प्रकारची सायबर फॉरेंसिकची व्यवस्था ही महाराष्ट्रामध्ये आपण तयार केलेली आहे देशातली सगळ्यात आधुनिक सायबर लॅब ही आपण महाराष्ट्रामध्ये तयार केलेली आहे आज जी कॅपेबिलिटी महाराष्ट्राने तयार केलेली आहे ती आता अन्य कुठल्याही राज्याकडे नाही किंबहुना अनेक राज्यातले लोक आता आपल्या महाराष्ट्रामध्ये येऊन आपल्याला विनंती करत आहेत की अशा प्रकारची लॅब आपण तयार करून द्या किंबहुना आपल्याकडे तर आता काही वेगवेगळ्या देशातनंही अशा प्रकारे आमच्या देशात करून द्या ही मागणी आली आहे.**

याच कार्यक्रमात मुंबई इथल्या सेमी ॲटोमेटेड सिस्टीमचं आणि पुण्यातल्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे ऑनलाईन लोकार्पणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाल.

**एक्सिऑम 4**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्लांसह ऑक्सिओम-4 मोहिमेतील तीन सहकाऱ्यांच्या परतीचा प्रवास आजपासून सुरू होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या मंगळवारी दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील, अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी समाजमाध्यमांवरील संदेशाद्वारे दिली आहे. त्यानंतर पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुल्का इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील. या मोहिमेअंतर्गत 14 दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत.

**अजित पवार**

पुण्यातल्या हिंजवडी इथल्या राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला अधिक चालना देण्यासाठी आणि या परिसरातील नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर सोडवण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयानं काम करावं, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी काल दिल्या. हिंजवडी भागात पावसामुळे साचणारं पाणी, स्वच्छतेचा प्रश्न आणि वाहतुकीच्या समस्या सोडवण्यासाठी तात्काळ नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, असं पवार म्हणाले. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील समस्या आणि पुणे मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्याच्या कामाची पाहणी केल्यानंतर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

**अहिल्यादेवी- अहिल्यानगर**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंतीच्या निमितानं तसंच "एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी" या उपक्रमांतर्गत अहिल्यानगर मधील आदर्श गाव हिवरे बाजार इथं मातृस्मृती वनमंदिरात काल वृक्षारोपण करण्यात आलं. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे आणि आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते फणस आणि बेहडा वृक्षाची रोपटी लावण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या वृक्षारोपण उपक्रमात 1876 दुर्मिळ देशी वृक्षांची लागवड करण्याचं नियोजन करण्यात आलं आहे.

**मंगल प्रभात लोढा**

राज्यातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणं ही राज्य शासनाची जबाबदारी आहे; या युवकांना स्वयंरोजगाराचं साधन उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही कौशल्य, रोजगार विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल पुण्यात दिली. कौशल्य विभाग, पुणे पोलीस आयुक्तालय आणि हरीभाई व्ही देसाई महाविद्यालयानं संयुक्तपणे आयोजित केलेल्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ते बोलत होते.

**वैद्यकीय महाविद्यालय-जळगाव**

जळगाव शहराजवळच्या चिंचोली इथल्या नियोजीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संकुलात, 50 खाटांच्या अतिदक्षता विभागाच्या स्वतंत्र इमारतीचं भूमिपूज जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते काल झालं. खासदार स्मिता वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यावेळी उपस्थित होते. हे क्रिटीकल केअर युनिट प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलं आहे. या विभागामुळे जिल्ह्यातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य सुविधा आणखी सक्षम होणार आहे.

**संजय देशमुख निधन**

राज्य शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क विभागातले अधिकारी संजय देशमुख याचं काल हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते 55 वर्षांचे होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून ते काम करत होते. त्यांच्या निधनाबद्दल प्रशासन, राजकीय तसंच पत्रकारिता क्षेत्रातील अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.

**निधन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुनील खेडकर यांचं काल पुण्यात निधन झालं. ते 64 वर्षांचे होते. बौद्धिक प्रमुख, प्रचार प्रमुख, सहकार्यवाह अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या होत्या.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना जिंकण्याची भारताला संधी असली तरी दुसऱ्या डावात 4 बाद 58 अशी पडझड झाली आहे. लॉर्ड्सवर सुरू असलेल्या सामन्यात इंग्लडचा दुसरा डाव 192 धावांवर संपुष्टात आला. फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक 4 बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी 2 बळी घेतले.भारताला विजयासाठी आणखी 135 धावांची आवश्यकता आहे. आज सामन्याचा अखेरचा दिवस आहे.

**विम्बलडन**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत काल रात्री उशीरा संपलेल्या सामन्यात, यानिक सिन्नरने बाजी मारली आहे. थरारक सामन्यात सिन्नरने गतविजेत्या कार्लोस अल्कराझचा 4-6, 6-4, 6-4, 6-4 असा पराभव केला. विम्बल्डन स्पर्धेच्या 148 वर्षांच्या इतिहासात सिन्नर पहिलाच इटालियन विम्बल्डन विजेता आहे.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट भागांमध्ये जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.